# ९५ टक्के भुयारीकरण पूर्ण

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसरातील ऐतिहासिक वारसा इमारतीजवळील मेट्रो-३च्या पॅकेज-१चे ९५ टक्के भुयारीकरण मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे पूर्ण करण्यात आले. हुतात्मा चौक ते सीएसएमटी हा डाऊन लाईन मार्गाचा ५६९ मी. भुयारीकरणाचा टप्पा एकूण ४१८ रिंग्जच्या सहाय्याने १०६ दिवसांत पूर्ण झाला. या पॅकेज अंतर्गत भुयारीकरणाचा ३७वा टप्पा यशस्वीरीत्या पार पडला आहे.

या भुयारीकरणासह पॅकेज-१ मधील कफ परेड ते सीएसएमटी दरम्यान एकूण २.९ किमी लांबीचे डाऊन लाईनचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे. सूर्या-२ या टनेल बोअरिंग मशीनद्वारे हे भुयारीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. ऐतिहासिक इमारती व समुद्रानजीक भुयारीकरण करण्याचे कठीण काम अभियंते व कामगारांमुळे सहज शक्य झाले. भुयारीकरण करताना सुरक्षेविषयी सर्व दक्षता घेत पॅकेज-१ चे आतापर्यंत ९५ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले, अशी माहिती मुंबई मेट्रो रेलचे व्यवस्थापकीय संचालक रणजितसिंह देओल यांनी दिली.

पॅकेज-१ अंतर्गत कफ परेड, विधान भवन, चर्चगेट आणि हुतात्मा चौक या मेट्रो स्थानकांचा समावेश असून आतापर्यंत या पॅकेज अंतर्गत भुयारीकरणाचे सहा टप्पे पूर्ण झाले.

## कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-3 मार्ग प्रगतीपथावर



### पॅकेज-१च्या भुयारीकरणाचा तपशील:

- कफ परेड ते विधान भवन (अप लाईन १२२८ मी, डाऊन लाईन १२५४ मी)
- विधान भवन ते चर्चगेट (अप लाईन ४९८ मी, डाऊन लाईन ४८१ मी)
- चर्चगेट ते हुतात्मा चौक (अप लाईन ६५४ मी)
- हुतात्मा चौक ते सीएसएमटी (डाऊन लाईन ५६९मी)